# Chain Snatchers arrested by Dhule Police

LCB rounded up gang of chain snatchers and detected 9 chain snatching offences and recovered muddemal.

## धुमस्टाईल चोरांची टोळी पोलिसांच्या हाती

## धुळ्यात तिघांना अटक; फराराचा शोध सुरू

धुळे (श्रमराज्य.कॉम)- पत्ता विचारण्याचा बहाणा करून धूमस्टाईलने महिलांच्या गळ्यातील सोनपोत (मंगळसूत्र) चोरणाऱ्या तिघा अट्टल चोरांना पोलिसांनी अटक केली आहे. वर्धा जिल्ह्यातील ही टोळी असल्याचे उघडकीस आले आहे. आणखी तीन जण फरार आहेत. पोलिसांनी त्यांच्याकडून ४ लाख १८ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळवले आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या (एलसीबी) पथकाने ही कामगिरी केली. शहरासह जिल्ह्यात धूमस्टाईल चोरट्यांची टोळी सक्रिय झाली होती. महिलांना पत्ता विचारणे, त्यांच्याकडून पाणी मागण्याचा बहाणा करून हे चोरटे महिलांच्या गळ्यातील सोनपोत ओरबाडून दुचाकीने धूमस्टाईलने पसार व्हायचे. सततच्या या घटनांमुळे महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

एलसीबीच्या पथकाने वर्धा जिल्ह्यातील रहिवासी व धुळे येथे नातेवाइकांकडे आलेले मंगल मोहन साळुंके, आकाश कन्हैया साळुंके यांना गुप्त माहिती व संशयावरून ताब्यात घेतले. त्यांना पोलिसी खाक्या दाखविल्यानंतर त्यांनी शहरात देवपूर, आझादनगर, पश्चिम देवपूर आदी पोलीस ठाणे हद्दीत सोनपोत चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर त्याचा साथीदार गोपाल संजय नेतलेकर यासदेखील अटक केली. तिघांची विचारपूस केल्यानंतर त्यांनी सोबत आणखी तीन साथीदार असल्याची कबुली दिली. ही कारवाई पोलीस अधीक्षक साहेबराव पाटील, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलीस निरीक्षक देवीदास शेळके, सहायक पोलीस उपनिरीक्षक विजय पाटील, पो. हे. कॉ. राजेंद्र सोनवणे, सुशील देसले, सुनील महाजन, पोलीस नाईक वसंत पाटील आदींनी केली. पोलिसांनी अटक केल्यानंतर या चोरट्यांचे तीन साथीदार फरार झाले आहेत. त्यांच्या शोधासाठी स्वतंत्र पथके स्थापन करण्यात आली असून फरार चोरट्यांचा शोध घेण्यास ती रवाना झाली असल्याची माहित पोलिस अधिक्षक साहेबराव पाटी यांनी दिली आहे.





